राजीनामा मंजूर करणेबाबत.
श्रीम.मयुरी पंजाबराव पंचाळ, कनिष्ठ सहाय्यक (लेखा)
गट-क, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
अर्थ विभाग
आदेश जा.क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/ ४५२ /२०२५
अहिल्यानगर दिनांकः- १०/११/२०२५

वाचा- १. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय जा.क्र.एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.-३३/९२/८ दिनांक ०२ डिसेंबर १९९७
२. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील नियुक्ती आदेश क्र. अर्थ/कार्या-१/आस्था-१/२१८/२०२४ दिनांक ३०/०७/२०२४
३. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.अहिल्यानगर यांचेकडील पत्र जा.क्र.आरोग्य/कार्या-२ / आस्था-१/६८५/२०२५ दिनांक ०७/०८/२०२५ सोबत श्रीमती पंचाळ, क.सहा.ले.यांचा राजीनामा अर्ज दिनांक २४/०७/२०२५
४. इकडील पत्र जा.क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/३५६/२०२५ दिनांक १९/०८/२०२५
५. जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.अहिल्यानगर यांचेकडील पत्र जा.क्र.आरोग्य/कार्या-२ / आस्था-१/९१५/२०२५ दि.१०/१०/२०२५ इकडेस प्राप्त दि.३१/१०/२०२५
६. अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण यांचेकडील आदेश क्र. ४३१ जा.क्र.लाभक्षेविप्रा.औ/आस्था-२/स.से.भ-२०२३-२४/२६२७ दिनांक १७/०७/२०२५

ज्याअर्थी, जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.अहिल्यानगर यांनी श्रीम.मयुरी पंजाबराव पंचाळ, कनिष्ठ सहाय्यक (लेखा) गट-क,आरोग्य विभाग, जि.प.अहिल्यानगर यांचा कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदाचा राजीनामा दिनांक २४/०७/२०२५ रोजीच्या अर्जान्वये संदर्भ क्रमांक ५ अन्वये मंजूरीस्तव या कार्यालयास सादर केलेला आहे.

ज्याअर्थी, श्रीम.मयुरी पंजाबराव पंचाळ, कनिष्ठ सहाय्यक (लेखा) गट-क,आरोग्य विभाग, जि.प.अहिल्यानगर या इकडील संदर्भ क्रमांक २ मधील नियुक्ती आदेशा अन्वये कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदावर दिनांक ०९/०८/२०२४ रोजी आरोग्य विभाग, जि.प.अहिल्यानगर येथे हजर झालेल्या आहेत.श्रीम.पंचाळ यांनी कनिष्ठ सहाय्यक (लेखा) गट-क या पदाचा राजीनामा दिनांक २४/०७/२०२५ रोजी दिला असून प्रस्तुत राजीनामा संदर्भ क्रमांक ६ अन्वये त्यांची नियुक्ती दप्तर कारकुन, जालना पाटबंधारे विभाग,जालना येथे झाल्याने सादर केलेला आहे. संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आवश्यक ते प्रमाणपत्रे तसेच संदर्भ क्रमांक ३ व ५ अन्वये कार्यालय प्रमुखांनी श्रीम.पंचाळ यांचे एक महिन्याचे मुळ वेतन संबंधित लेखाशिर्षाखाली भरणा करुन चलनाची प्रत सादर केलेली आहे.

श्रीम.मयुरी पंजाबराव पंचाळ, कनिष्ठ सहाय्यक (लेखा) गट-क,आरोग्य विभाग, जि.प.अहिल्यानगर, यांचेकडे कोणत्याही प्रकारचे शासकीय येणे प्रलंबित नसलेने व कोणत्याही प्रकारची चौकशी चालू अथवा प्रलंबित नसलेबाबतचा प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

त्याअर्थी, संदर्भ क्रमांक १ मधील शासन निर्णयातील तरतुदीनुसार व संदर्भ क्रमांक ३ व ५ च्या अर्जानुसार मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन श्रीम.मयुरी पंजाबराव पंचाळ, कनिष्ठ सहाय्यक (लेखा) यांनी सदर पदाचा राजीनामा दि.२४/०७/२०२५ रोजीपासून दिलेला आहे. तरी श्रीम.पंचाळ यांच्या राजीनाम्यास दिनांक २४/०७/२०२५ पासुन मंजुरीत कार्योत्तर मान्यता देत आहे.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२५१११००५००६० असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 10-11-2025 19:50:07
आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्रीम.मयुरी पंजाबराव पंचाळ, कनिष्ठ सहाय्यक (लेखा), आरोग्य विभाग, जि.प.अहिल्यानगर.

व्दारा व प्रत- जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर.

२/-सदर आदेशाची नोंद श्रीम.पंचाळ यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी. तसेच सदर आदेश श्रीम.पंचाळ यांना बजावून दिनांकीत स्वाक्षरीची प्रत दप्तरी दाखल करावी. प्रस्तुत बाबत श्रीम.पंचाळ यांचेकडे कोणत्याही प्रकारे थकबाकी / येणेबाकी नसल्याची खात्री करुन आदेशाची अंमलबजावणी करावी.

प्रत- मुळ नस्ती.